अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

भारताचा पाकिस्तानवर ८ विकेटने विजय

कोलंबो : साई सुदर्शन याचे दमदार शतक आणि राजवर्धन हंगरगेकर याच्या पाच विकेटच्या बळावर भारत अ संघाने पाकिस्तान अ संघाचा पराभव केला. राजवर्धन हंगरगेकर याने पाच विकेट घेत पाकिस्तानला मोठ्या धावसंख्येपासून रोखले. पाकिस्तानच्या आव्हानाचा पाठलाग करताना साई सुदर्शन याने दमदार शतक झळकावले.

पाकिस्तानने दिलेले २०६ धावांचे आव्हान भारताने ८ विकेट राखून सहज पार केले. साई सुदर्शन याने विजयी षटकार लगावला. साई सुदर्शन याने नाबाद १०४ धावांची खेळी केली.२०६ धावांचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजांनी दमदार सुरुवात केली. सलामी फलंदाज साई सुदर्शन आणि अभिषेक शर्मा यांनी सावध सुरुवात केली. साई सुदर्शन आणि अभिषेक शर्मा या जोडीने ५८ धावांची सलामी दिली. अभिषेक शर्मा २० धावा काढून तंबूत परतला. मुबासीर खान याने पाकिस्तानला पहिले यश मिळवून दिले.

अभिषेक शर्मा याने २८ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २० धावांचे योगदान दिले. अभिषेक बाद झाल्यानंतर साई सुदर्शन याने निकन जोस याच्यासोबत भारतीय डावाला आकार दिला. अभिषेक शर्मा आणि जोस यांनी दुसऱ्या विकेटसाठी ९९ धावांची भागिदारी केली. या जोडीने संयमी फलंदाजी करत भारतीय संघाच्या विजयाचा पाया रचला. १५% धावांवर भारताला दुसरा झटका बसला. एम मुमताज याच्या गोलंदाजीवर जोस बाद झाला. जोस याने ६४ चेंडूत ५३ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. या खेळीमध्ये त्याने सात चौकार लगावले. निकन जोस बाद झाल्यानंतर कर्णधार यश धुल आणि साई सुदर्शन यांनी संयमी फलंदाजी केली. साई सुदर्शन याने ११० चेंडूत ३ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीने १०४ धावांची खेळी केली. कर्णधार यश धुल याने १९ चेंडूत २ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २१ धावांचे योगदान दिले.

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २० जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

आता अजितोत्सवाचा 'धुमधडाका'

सत्तेत आल्याने मोदी-शहांकडून अजितदादांना मिळाले 'मानाचे पान'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्याच्या सत्तेत गेल्या आठवडाभरापासून बरेच नाट्य घडले. धमाकेवर धमाके झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्यासह आठ आमदारांनी सत्तेत गेल्यानंतर मोठा राजकीय भूकंप झाला. त्यानंतर दादांसह त्यांच्या समर्थकांनी शरदरावांच्या भेटीला दोनदा गेल्यामुळे सारा महाराष्ट्र अवाक् झालाच. राज्य विधी मंडळाचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर तापलेले राजकीय वातावरण निवळायला सुरूवात झाली आहे. तूर्तास तरी राजकीय धमाका थंडावला. आता राज्यात धूमधडाका पहायला मिळणार आहे, निमित्त आहे, 'अजित उत्सव'चा.

अजितदादा म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसमधील बडे प्रस्थ. स्वभाव आक्रमक. जे बोलायचे, ते स्पष्ट आणि सत्य. मागेपुढे काहीही नाही. जो चुकेल, त्याचे कान उपटलेच म्हणून समजा. प्रशासनावर जबरदस्त हुकूमत. त्यामुळे 'जिथे दादा, तिथे आम्ही' तसेच 'जिथे दादा,तिथेच आमचा वादा', असा निर्धार राष्ट्रवादीतील तरुण कार्यकर्त्यांचा असतो. त्यामुळे दादांभोवती तरुणांचा मोठा घोळका असतोच.शिवाय दादांना तरुणवर्ग अत्यंत प्रिय. त्यांचा स्पष्टवक्तेपणा हा स्थायीभाव असून काहींना तो आवडत नसेल तरीही महाराष्ट्राला तो रुचला आहे. दादांचा शनिवार दि.२२जुलैला वाढदिवस साजरा केला जाणार आहे. पुन्हा सत्तेत आलेल्या दादांचा वाढदिवस जोमात साजरा केला जाणार आहे. त्यांच्या वाढदिवसाची यंदाची थिम आहे, 'अजितोत्सव'.३१ जुलैपर्यंत राज्यात या उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रमांचा धूमधडाका असणार आहे. दादा हे गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रबिंदू ठरले आहेत. राष्ट्रवादीत काँग्रेसमध्ये बंडखोरी करत अजितदादांसह आमदारांचा मोठा गट थेट शिंदे फडणवीस सरकारमध्ये दाखल झाला. अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची तर आठ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसकडून 'अजित उत्सव' सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली आहे. तटकरे यांनी दादांच्या वाढदिवसानिमित्त मोठी घोषणा केली आहे. राष्ट्रवादीच्या वतीने 'अजित उत्सव' नावाने सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातला शेतकरी संकटात आहे, पेरण्या झालेल्या नाहीत, त्यामुळे प्रदर्शन न करता सामाजिक उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. रक्तदान शिबिर, पावसाळ्यामुळे छत्र्या वाटप, वृक्ष लागवड, शालेय साहित्य, स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान, ग्रामस्वच्छता असे सामाजिक उपक्रम या उत्सव काळात राबवले जातील, असे तटकरे यांनी सांगितले.राज्यभरातील कार्यकर्ते त्यासाठी जोमाने कामाला लागले आहेत.

यंदा विलक्षण योगायोग, पुन्हा नवी उत्सुकता

अजितदादांच्या वाढदिनी यंदा एक विलक्षण योगायोग महाराष्ट्राला पहायला मिळणार आहे.अजितदादांच्या वाढदिनी भाजपा नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही त्याच दिवशी वाढदिवस आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे एकाच दिवशी बर्थडे सेलिब्रेशन होणार आहे. भाजप-शिवसेनेच्या सरकारमध्ये अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचा एक गट सामील झाला.ते फडणवीस यांच्यासोबतच उपमुख्यमंत्री बनले. योगायोग म्हणजे या दोघांचा वाढदिवस एकाच दिवशी असतो. आणि आता सत्तेत एकत्र आल्यानंतर दोघेही एकत्र वाढदिवसाचा जल्लोष करणार आहेत. अजितदादा आणि फडणवीस यांचे पक्ष जरी वेगळे असले तरी त्यांच्यात चांगले मैत्रीचे नाते आहे. पहाटेच्या शपथविधीमुळे दोघांची मैत्री जगासमोर आली होती. दरम्यान दोघांनीही सत्तेत एकत्र येऊन दाखवले. आता दोघेही सत्तांतर नाट्यानंतर एकत्र वाढदिवस साजरा करणार आहेत. विशेष म्हणजे सर्व सत्ताधारी आमदारांना या पार्टीचे आमंत्रण देण्यात आले आहे. गुरूवारी २० जुलै रोजी महायुतीचे आमदार यांची डिनर डिप्लोमसी पाहायला मिळणार आहे. ही पार्टी मुंबईतील हॉटेल ओबरॉय येथे संध्याकाळी होणार आहे. या पार्टीला अजितदादांचे कोणकोणते समर्थक आमदार उपस्थित राहणार याविषयी राज्यात नवी उत्सुकता निर्माण झाली आहे.

मोदी-शहा यांच्याकडून मिळाले मानाचे पान...

भाजपकडून एनडीएतील घटक पक्षांची दिल्लीत मंगळवारी जी बैठक बोलावली होती,त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा यांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. शिंदे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रांगेतच आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्यामध्ये तर अमित शाह यांच्या बाजूला अजितदादा बसलेले होते. शिंदे या बैठकीत महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत एनडीएच्या एकूण ४५ जागा निवडून आणणार असल्याचे सांगितले. तर लोकसभा निवडणुकीसाठी आम्ही एकत्र असू,असा विश्वास अजितदादांनी या बैठकीत दिला. अजितदादांनी सत्तेत येवून शिंदे-भाजप सरकार अधिक भक्कम केल्याने भाजपच्या व्यासपीठावर दोघांनाही मानाचे पान दिले गेल्याचे मानले जात आहे.

राजस्व नगर येथे गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

विजापूर रोडवरील राजस्व नगरात राहणाऱ्या एका ६२ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटना बुधवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.

फुलचंद नानाराव कांबळे (वय ६२ रा. राजस्व नगर असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. घरातील पंख्याच्या लोखंडी बारला त्याने दोरीने गळफास घेतला होता. हा प्रकार सकाळी ८ वाजेच्या सुमारास उघडकीस आला. घरातील लोकांनी फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता मयत झाल्याचे सांगण्यात आले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.हवालदार सोनार पुढील तपास करीत आहेत.

संत चोखामेळा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.पुजारी

सुराज्य/मंगळवेढा

संत चोखामेळा अध्यासन केंद्र पुणे व वृंदावन फाऊंडेशन आयोजित संत चोखामेळा साहित्य संमेलनच्या अध्यक्षपदी मंगळवेढा येथील संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पुजारी यांची निवड करण्यात आली आहे.

चोखामेळा साहित्य संमेलन २०२३ नियोजनाबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील संत तुकाराम अध्यासन केंद्र येथे झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या अध्यक्ष प्राचार्या उल्काताई धावारे चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत तुकाराम - संत ज्ञानेश्वर - संत नामदेव अध्यासनाचे समन्वयक प्रो.डॉ.ओम श्रीश दत्तोपासक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या साहित्य संमेलनाचे पहिले अध्यक्ष म्हणून संत साहित्याचे गाढे अभ्यासक, संत चोखामेळा व परिवारातील संताच्या अभंगाचे संशोधक चारित्रलेखक प्राचार्य डॉ.आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. हे दोन दिवसीय साहित्य संमेलन एकूण सहा सत्रात विभागून होणार असून आळंदी येथे १८ व १९ नोव्हेंबरला संपन्न होणार आहे.



वाळू खरेदीसाठी प्रशासनाकडून ऑनलाईन महाखनिज ॲप खुले

५ डेपोंवर वाळू विक्रीसाठी उपलब्ध, ६०० रूपये दराने मिळणार

सुराज्य/सोलापूर

शासनाच्या धोरणानुसार सोलापूर जिल्ह्यातील पाच वाळू डेपो वाळू साठा करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून महाखनिज ॲप सर्व सामान्य नागरिकांसाठी नोंदणी करण्यासाठी खुली करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर ऑनलाईन नोंदणी करून वाळू प्रतिब्रास ६०० रुपये दराने उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिली.

शासनाच्या १९ एप्रिल २०२३ मसूल विभागाच्या धोरणा नुसार राज्यातील नागरिकांना माफक दरात वाळू उपलब्ध व्हावी तसेच अवैध वाळू उत्खनन वाहतुकीस प्रतिबंध आळा घालण्यासाठी वाळूचे धोरण ठरवण्यात आले होते. प्रत्येक व्यक्तीला ६०० रुपये प्रतिब्रास वाळू खरेदी दिली जाणार आहे. या वाळू डेपो पासून वाहतुकीचा खर्च करून ही वाळू नागरिकांना मिळणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात माळशिरस तालुक्यातील वाफेगाव, उंबरे (वे), जांभूड, पंढरपूर तालुक्यातील चळे, मंगळवेढा तालुक्यातील उचेठाण यापैकी माळशिरस तालुक्यातील उंबरे, जांभूड, व पंढरपूर तालुक्यातील चळे, या वाळू घाटा जाहीर लिलाव करून वाळू उपास करण्यासाठी मक्तेदार फिक्स केला होता. गेली दोन महिने झाले या मक्तेदारांच्या माध्यमातून वाळू साठा करण्याचे काम चालू होते. या पाच वाळू ठेक्यावर मोठ्या प्रमाणात वाळू साठा झाल्याने जिल्हा प्रशासनाच्या वतीने वाळू खरेदीसाठी ऑनलाईन संकेत स्थळ खुले केले आहे. ज्या ग्राहकांना वाळूची आवश्यकता आहे त्यांनी ऑनलाईन महाखनिजच्या www.mahakhanij.maharashtra.gov.in वेबसाईटवर वाळू खरेदी मागणीची नोंद करावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. वाळू खरेदीची मागणी नोंदवताना अर्जदारांनी स्वतःचे ओळखपत्र वेबसाईट वरती अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच सदरची वाळू ही प्रतिब्रास ६०० रुपये या दराने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. वाळू डेपो पासून वाहतुकीचा खर्च स्वतः करावा लागणार आहे. परिवहन विभागाकडून तालुक्यातील वाहनांकरिता वाळू वाहतुकीचे दर निश्चित करण्यात आलेले आहेत. जीपीएस द्वारे नोंदणीकृत असणाऱ्या वाहनातून सदरची वाळू डेपोमधून घेता येणार आहे. या गाड्याचे वाहतुकीचे दर आरटीओ विभागाने दर निश्चित केले आहेत. त्याच दराने वाहतूक करून वाळू घेऊन जावी अशा सूचना केल्या आहेत.

मांजर चावल्याने १२ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

तुळजापूर तालुक्यातील निलेगाव येथील घटना

सुराज्य/सोलापूर

मांजर चावल्याने एका १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही आगळी वेगळी घटना निलेगाव (ता.तुळजापूर) येथे मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली.

नोमान उस्मान पटेल (वय १२ रा. निलेगाव ता.तुळजापूर) असे मयत झालेल्या मुलाचे नाव आहे . काल रात्री ८ वाजेच्या सुमारास त्याच्या उजव्या पायाला मांजराने दंश केला होता. त्याला जास्त त्रास होऊ लागल्याने त्याचे वडील उस्मान पटेल यांनी पहाटे ३ वाजेच्या सुमारास सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र नोमान हा उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली. नोमान याचा मृत्यू कशामुळे झाला ? याची तपासणीसाठी मृतदेहाचे विच्छेदन करण्यात आले आहे. शवविच्छेदनानंतर नोमानचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी नातेवाईकांच्या ताब्यात सकाळी देण्यात आला.

मोरवंची येथे तरुणाची विष पिऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

मोरवंची (ता.मोहोळ) येथे राहणाऱ्या २३ वर्षीय तरुणाने दारूच्या नशेत विष पिऊन आत्महत्या केली. घटना बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

भरत पांडुरंग रोकडे (वय २३ रा.मोरवंची) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने आज पहाटे २ वाजेच्या सुमारास मोरवंची येथील शेतात विष प्राशन केले होते. त्याला पांडुरंग (वडील) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान तो सकाळी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



एका 'पेनड्राईव'मुळे सगळ्या फायली पाण्यात !!!

कल्याण
399-14-590

मेन बाजार
590-42-679

भाजपच्या शहराध्यक्षपदी नरेंद्र काळे

सोलापूर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी आ. कल्याणशेट्टी व चेतनसिंह केदार यांच्याकडे

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील अंतर्गत राजकारणामुळे बाजूला पडलेले भाजपा प्रदेश ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष, माजी विरोधी पक्षनेते नरेंद्र काळे यांची अखेर भाजपा सोलापूर शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची फेरनिवड तर माढा लोकसभा विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी चेतनसिंह केदार-सावंत यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईतून या निवडी जाहीर केल्या. गेल्या महिना दोन महिन्यांपासून शहर आणि जिल्हाध्यक्ष पदाची निवड होणार अशी चर्चा चालू होती मात्र काही ना काही कारणास्तव निवड पुढे ढकलण्यात येत होती. त्याला बुधवारी मुहूर्त मिळाला. शहराध्यक्ष पदासाठी नरेंद्र काळे यांच्यासह अनंत जाधव, चन्नवीर चिट्टे, पांडुरंग दिड्डी, हेमंत पिंगळे, अप्पासाहेब चौगुले, शिवानंद पाटील आदी इच्छुक होते. मात्र यामध्ये नरेंद्र काळे यांनी अखेर बाजी मारली.

गेल्या महापालिका निवडणुकीत त्यांना उमेदवारी मिळाली नसल्यामुळे ते काही काळ पक्षापासून दूर गेले होते. त्यानंतर मागील तीन महिन्यांपूर्वी त्यांची भाजप प्रदेश ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली होती. आता त्यांची शहराध्यक्षपदी वर्णी लागली आहे. नरेंद्र काळे हे यापूर्वी आमदार सुभाष देशमुख यांचे निकटवर्तीय समजले जात होते. मात्र काही कारणास्तव दोघांमध्ये वाद झाल्यावर ते आमदार विजयकुमार देशमुख यांच्या गटात सामील झाले.

दुसरीकडे सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी आ. सचिन कल्याणशेट्टी यांची फेरनिवड करण्यात आली आहे. आमदारकीच्या व्यापामुळे आ. कल्याणशेट्टी यांनी ना ना ची भूमिका घेतली होती. पण त्यांचीच जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करुन त्यांच्या पक्षश्रेष्ठींनी विश्वास दाखविला आहे. तसेच माढा विभाग जिल्हाध्यक्षपदी सांगोला तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांना संधी देण्यात आली आहे. सांगोला तालुकाध्यक्ष म्हणून काम करत असताना चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगोला तालुक्यातील प्रत्येक गावागावात पक्षाचा विचार पोहचविण्याचे काम केले. तालुक्यात भाजपचे मजबूत संघटन निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेवून वरिष्ठांनी त्यांच्यावर सोलापूर माढा ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. यापूर्वी चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगोला नगरपालिकेचे नगरसेवक, उपनगराध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे.

पक्ष बळकट करणार : नरेंद्र काळे

निवडीनंतर शहर अध्यक्ष नरेंद्र काळे म्हणाले, आगामी महापालिका विधानसभा लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाने मला ही जबाबदारी दिलेली आहे. पक्षाच्या संघटनात्मक कामाला आणखी बळकटी देण्यासाठी आगामी काळात काम करणार आहे. पक्षाचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, बूथ प्रमुख, पन्ना प्रमुख, विविध आघाड्या, मोर्चे, समित्यांचे पदाधिकारी, सदस्य आणि सर्व भाजप कार्यकर्ते यांच्यासोबत पक्षाचे काम वाढविण्याचा प्रयत्न राहील.

जिल्हा भाजपमय करणार : केदार

भारतीय जनता पार्टीचा विचार, प्रसार आणि प्रचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. पक्षाने आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकली आहे. आगामी काळात सर्वांच्या सहकार्याने आणि सर्व ज्येष्ठ नेत्यांना घेऊन जिल्हा भाजपमय करण्याचे ध्येय आहे. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी आपले प्रयत्न राहणार असल्याचे नूतन जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार यांनी सांगितले.